**QP Code : 50053**

(3 Hours) (Total Marks- 100

सूचना -१)सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२)अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

३)उजवीकडील अंक गुणदर्शक आहेत.

प्रश्न १.खालील सर्व बहुपर्यायी उत्तरांच्या प्रश्नांची योग्य उत्तरे तुमच्या प्रश्नपत्रिकेत नोंदवा. (४०)

१.'औचित्य' हे काव्याचे लक्षण कोणत्या संस्कृत साहित्यशास्त्रज्ञाने सांगितले आहे ?

अ)दंडी ब)क्षेमेंद्र क) भरत ड) भामह

२.खालील शब्दांतील कोणता काव्यगुण वामनाने सांगितलेल्या काव्यगुणांत समाविष्ट नाही ?

अ)प्रासाद ब)ओज क) सौंदर्य ड) माधुर्य

३.'तल्लिलेमधी तल्लिन न हो कल्लोलिनी कवी कवन करी' या ओळींत कोणता काव्यालंकार आहे ?

अ) अनुप्रास ब)उत्प्रेक्षा क) उपमा ड)यमक

४. काव्यातील रस हा अनुमित असतो हे कोणाचे मत आहे ?

अ)श्रीशंकुक ब) भट्टनायक क)अभिनवगुप्त ड)भट्टतौत

५.भावकवितेतील भाषेत नियमोल्लंघनामुळे सौंदर्य निर्माण होते हे वैशिष्ट्य कोणी सांगितले आहे ?

अ) प्लेटो ब) मुकारोवस्की क)मायकोवस्की ड)शॅक्लोवस्की

६.'प्रेरणा संतुलनाचा सिद्धांत' कोणत्या पाश्चात्त्य साहित्यशास्त्रज्ञाने मांडला आहे ?

अ)ॲरिस्टॉटल ब)ब्रूक्स क)रिचर्डस ड) वर्डस्वर्थ

७.कवितेतील पहिल्या आणि दुय्यम श्रेणीच्या कल्पनाशक्तीबद्दल कोणी मांडणी केली आहे ?

अ) वर्डस्वर्थ ब)एडगर ॲलन पो क)कोलरिज ड)अर्नोल्ड

८.'कलेतील अनुकृती ही आदिसत्वाची असते' असे कोणी म्हटले आहे ?

अ) प्लेटो ब)ॲरिस्टॉटल क)सिडनी ड)हॉरेस

3BB798552D430087D4993C39A22A569

**[TURN OVER**

९.'गोड व पांढरं' गणाच्या म्हणजेच विकारी व अविकारी विशेषणांबद्दल कोणी सांगितली आहे ?

अ) कृष्णशास्त्री गोडबोले ब) अरविंद मंगरूळकर क) मो.के.दामले ड)रा.भि.जोशी

१०.षष्ठी विभक्तीला -------नसल्याने ती वादग्रस्त ठरते

अ) प्रत्यय ब)उपपदार्थ क)कारकार्थ ड) आख्यात

११.धातूसाधित शब्दांना --------म्हणतात.

अ) कृदंते ब)विशेषणे क) सर्वनाम ड) तद्धिते

१२. 'च्यान्त विशेषणां'पासून षष्ठीच्या विभक्ती प्रत्ययांची उत्पत्ती झाली असे कोणाचे मत होते ?

अ) मॅक्सम्युलर ब)राजवाडे क)भांडारकर ड) गोडबोले

१३.मराठीतील पहिल्या कादंबरीचे नाव काय आहे ?

अ) मधल्या भिंती ब) पण लक्षात कोण घेतो क) यमुनापर्यटन ड) रागिणी

१४.'हद्दपार ' ही कादंबरी कोणत्या लेखकाने लिहिली आहे ?

अ) शरच्चंद्र मुक्तिबोध ब) दीनानाथ मनोहर क) श्री.ना.पेंडसे ड) वि.स.खांडेकर

१५.खालीलपैकी कोणत्या लेखकावर गांधीवादी विचारसरणीचा प्रभाव होता ?

अ) ) वामनराव चोरघडे ब)ग.त्र्यं माडखोलकर क)ह.ना.आपटे ड) भालचंद्र नेमाडे

१६.खालीलपैकी कोणती कादंबरी पत्रात्मक आहे ?

अ) ययाती ब)रागिणी क)इंदू काळे –सरला भोळे ड) आश्रमहरीणी

१७.'डफ-फड' यासारख्या शब्द जोडीला स्वननिश्चितीच्या तंत्रात काय नाव आहे?

अ)पुरक युग्म ब)सदृश युग्म क)अल्पतम युग्म ड)विधर्मी शब्द

१८.'लांग ' आणि 'पारोल' या संज्ञा कोणत्या भाषा शास्त्रज्ञाने वापरल्या आहेत ?

अ)हॉकेट ब) सोस्युर क)चॉम्स्की ड) ब्रुमफिल्ड

3BB7988552D430087D4993C39A22A569

१९.'प्रविण','कुशल' हे शब्द अर्थपरिवर्तनाच्या कोणत्या प्रक्रियेची उदाहरणे आहेत ?

अ) अर्थच्युती ब)अर्थसंकोच क)अर्थविस्तार ड)ग्राम्यता परिहार

२०.एकाच स्वनाच्या स्वनिक परिसरानुसार होणाऱ्या भिन्न उच्चारांना काय म्हणतात ?

अ)रूपस्वनिमिकी ब)स्वनिम क)स्वनांतरे ड)रूपिम

२१.आदिबंधात्मक समीक्षा पद्धतीत मनातील कोणत्या स्तरावरील प्रतिमांना महत्त्व असते ?

अ)अनिमा ब)बाह्यमन क) सामुहिक अचेतन मन ड) जाणिव

२२.मानसशास्त्रातील स्वप्नसिद्धांत कोणी मांडला आहे ?

अ) फ्रॉईड ब)लाकाँ क) युंग ड)नॉर्थ्रोप फ्राय

२३. मार्क्सवादी समीक्षेत 'निगेटीव नॉलेज मॉडेल' कोणी मांडले आहे ?

अ)बाख्तिन ब) थिओडोर अडोर्नो क) ल्युसिए गोल्डमन ड)देरीदा

२४.'लेखकाचा मृत्यू झाला आहे' हे विधान कोणाचे आहे ?

अ)रोलां बार्थ ब)विक्टर शॅक्लोवस्की क)मायकोवस्की ड)नित्शे

२५.'वाचक प्रतिसादकेंद्री' समीक्षा पद्धती कोणी सांगितली आहे ?

अ)विमसॅट ब)ब्रिअर्डले क) वुल्फगँग आयझर ड)ल्युकास

२६.'अखंड' हा काव्यप्रकार कोणी प्रचलित केला ?

अ)तुकाराम ब)नामदेव क)महात्मा फुले ड) विष्णुशास्त्री चिपळूणकर

२७. मराठीतले पहिले वर्तमानपत्र 'दर्पण" कोणत्या साली प्रकाशित होऊ लागले ?

अ)१९२० ब)१८८५ क)१८३२ ड)१८९७

२८.'गुलामगिरी' हा निबंध कोणी लिहिला ?

अ)कृष्णराव भालेकर ब)नारायण मेघाजी लोखंडे क)ज्योतिबा फुले ड)गोपाळराव आगरकर

२९.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या नियतकालिकाचे नाव काय होते ?

अ) दीनबंधू ब)मूकनायक क) प्रभाकर ड) सुधारक

[TURN OVER



3BB7988552D43087D4993C39A22A569

३०.'भारतीय स्त्रीजीवन' हा प्रबंध कोणी लिहिला आहे ?

अ)मालतीबाई बेडेकर ब)गोदावरी केतकर क)गीता साने ड)प्रेमा कंटक

३१.माधव ज्युलियन यांनी लिहिलेले खंडकाव्य कोणते ?

अ)विरहतरंग ब)सुधारक क)गज्जलांजली ड) मधुशाला

३२.'रिकामे मधुघट' ही कविता कोणी लिहिली आहे ?

अ) भा.रा.तांबे ब)माधव त्रिंबक पटवर्धन क) गोविंदाग्रज ड)बा.भ.बोरकर

३३.'नावल आणि नाटक' हे पुस्तक कोणी लिहिले आहे ?

अ) रा.भा.पाटणकर ब)वि.का.राजवाडे क)का.बा.मराठे ड) श्री.व्यं.केतकर

३४.'तुही इयत्ता कंची' हा काव्यसंग्रह कोणी लिहिला आहे ?

अ)राम दोतोंडे ब)नामदेव ढसाळ क) दया पवार ड)त्र्यंबक सपकाळे

३५.'आभरान' हे आत्मकथन कोणी लिहिले आहे ?

अ)वामन होवाळ ब)प्र.ई.सोनकांबळे क) पार्थ पोळके ड)भीमराव गस्ती

३६.'झेलझपाट ' ही आदिवासींच्या जीवनावरची कादंबरी कोणी लिहिली आहे ?

अ)विनायक तुमराव ब)प्रमोद मुनघाटे क) नाजुबाई गाबित ड)मधुकर वाकोडे

३७.पुढीलपैकी कोणती कादंबरी भाऊ पाध्ये यांनी लिहिलेली नाही ?

अ)वैतागवाडी ब)प्रतिबद्ध क)बॅरिस्टर अनिरूद्ध धोपेश्वरकर ड)जेलबर्ड

३८.'स्थलांतर' ही कादंबरी कोणत्या लेखिकेने लिहिली आहे ?

अ) सानिया ब)गौरी देशपांडे क) आशा बगे ड)नीरजा

३९.विजय तेंडुलकर यांचे विविध भारतीय भाषांत भाषांतरीत झालेले नाटक कोणते ?

अ)घाशिराम कोतवाल ब)शांतता कोर्ट चालू आहे क)सखाराम बाईंडर ड)गिधाडे

४०.'त्रिनाट्यधारा' हा प्रयोग कोणत्या मराठी नाटककाराने केला आहे ?

अ)महेश एलकुंचवार ब)वि.वा.शिरवाडकर क)वसंत कानेटकर ड)रत्नाकर मतकरी

[TURN OVER



3BB798552D430087D4993C39A22A569

प्रश्न २.खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा . (**कोणतेही तीन**) (३०)

१.कवितेच्या भाषेतील प्रतिमा , प्रतिक आणि रूपक या संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

२.विजय तेंडुलकर यांच्या नाटकांच्या वैशिष्ट्यांची साधार चर्चा करा.

३.मराठीतील बखर वाङ्.मयाचा परिचय करून द्या.

४.'अस्तित्ववाद ' या साहित्य संप्रदायाचे विशेष लिहा.

५. मराठीतील ग्रामीण साहित्याच्या प्रवाहाचा आढावा घ्या.

प्रश्न ३. खालीलपैकी कोणतेही **दोन** प्रश्न सविस्तर लिहा. (३०)

१.फुले-आंबेडकरवादी साहित्याची प्रेरणा व विशेष याबद्दल उदाहरणांसह लिहा.

२.लोकसाहित्याचे संशोधन करण्याच्या पद्धती व अडथळे यांचा परामर्श घ्या.

३.लेखकाभ्यासाच्या रीती आणि लेखकाभ्यासात येणाऱ्या अडचणी यांची चर्चा करा.

४.भाषेच्या अभ्यासाच्या ऐतिहासिक आणि सामाजिक भाषाविज्ञान या पद्धतींचा परिचय करून द्या.

---

3BB7988552D430087D4993C39A22A569